**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः04.10.2023** **वारः बुधवार**

---

**ठळक बातम्या**

- नांदेड शासकीय रुग्णालयातील मृत्यू प्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
- दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या आनंदाच्या शिध्यामध्ये मैदा आणि पोह्याचाही समावेश
- राज्यातल्या 2359 ग्रामपंचायतींसाठी 5 नोव्हेंबरला मतदान
- आशियाई क्रीडा स्पर्धेत 69 पदकांसह भारत पदकतालिकेत चौथ्या क्रमांकावर आणि
- राज्यात आतापर्यंत सरासरीच्या 91 पूर्णांक 60 दशांश टक्के पावसाची नोंद

**नांदेड-मुख्यमंत्री**

नांदेडच्या शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात झालेल्या घटनेची शासनाने गंभीर दखल घेतली असून या घटनेची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात येईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. मंत्रालयात काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.दरम्यान नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयात गेल्या 3 दिवसात 31 जणांचा मृत्यू झाला असून या सर्व मृत्यूंच्या कारणांची चौकशी केली जाईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी काल दिली. नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह रुग्णालयाला भेट दिल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या प्रकरणाच्या चौकशीसाठी त्रिसदस्य समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती आपला अहवाल दोन दिवसात सादर करेल असं मुश्रीफ म्हणाले. रुग्णालयातली रिक्त पदं तत्काळ भरली जातील. स्वच्छतेचं काम बाह्ययंत्रणेमार्फत केलं जाईल, असंही ते म्हणाले. यापुढे एकही मृत्यू होणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

**मंत्रिमंडळनिर्णय**

राज्यातल्या शिधापत्रिकाधारकांना या वर्षी दिवाळीनिमित्त शंभर रुपयात 'आनंदाचा शिधा' देण्याचा निर्णय काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. आनंदाचा शिधा या संचात पूर्वी, रवा, चणाडाळ, साखर आणि खाद्य तेल असे 4 जिन्नस होते. आता यामध्ये मैदा आणि पोहे हे दोन नवीन जिन्नसही दिले जाणार आहेत.विदर्भ आणि मराठवाड्यातील उच्चदाब वितरण प्रणाली योजनेला मंत्रिमंडळानं मुदतवाढ दिली, तसंच या विभागातील कृषिपंप वीज जोडण्या वेगानं पूर्ण करण्याचाही निर्णय घेण्यात आला. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरता परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी 10 कोटी 80 लाख रुपयांच्या खर्चाला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक या विषाणूजन्य रोगाचा आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. कृषी विभाग तसंच मदत आणि पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले.

**ग्रा.पं.निवडणुका**

राज्यभरातील सुमारे 2 हजार 359 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि 2 हजार 950 सदस्यपदाच्या; तर 130 सरपंचपदांच्या पोटनिवणुकांसाठी येत्या 5 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी काल मुंबईत केली. संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात कालपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकांसाठी 16 ते 20 ऑक्टोबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. अर्जांची छाननी 23 ऑक्टोबर रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 25 ऑक्टोबर असून, त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचंही वाटप करण्यात येईल. 5 नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच या वेळेत मतदान होईल आणि मतमोजणी 6 नोव्हेंबरला होईल. मात्र गडचिरोली आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागात सकाळी साडेसात ते दुपारी 3 पर्यंत मतदानाची वेळ आहे. तिथं, 7 नोव्हेंबरला मतमोजणी होईल.

**राज्यपाल**

मुंबईतील जागतिक व्यापार केंद्रात भरवण्यात आलेल्या, चौथ्या जागतिक व्यापार प्रदर्शनाचं काल, राज्यपाल रमेश  बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत, उद्घाटन झालं. हे जागतिक व्यापार प्रदर्शन विविध देशांमध्ये व्यापार सहकार्य वाढवण्याच्या दृष्टीने मैत्रीसेतूचं काम करेल, असं राज्यपाल यावेळी म्हणाले. या प्रदर्शनात 30 देश सहभागी झाले असून, देशातील पाच राज्यांनी देखील यात सहभाग घेतला असल्याची माहिती, मुंबईच्या जागतिक व्यापार केंद्राचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री यांनी दिली.

**वाघनखं करार**

छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं भारतात आणण्याबाबत काल लंडनमधील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमच्या संचालकांसोबत करार करण्यात आला. सास्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, उद्योगमंत्री उदय सामंत आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. सर्व शिवप्रेमींसह, महाराष्ट्र तसंच देशासाठीही हा क्षण ऐतिहासिक असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

**नाशिक-कांदा**

कांदा व्यापाऱ्यांनी आपलं लिलाव बंद आंदोलन मागे घेतल्याने कालपासून नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न समित्यांमध्ये कांदा लिलाव सुरू झाले. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत काल सकाळी कांद्याला किमान 900 तर कमाल 2541 रूपयांचा भाव मिळाला. कांद्याच्या निर्यात शुल्कात केलेल्या वाढीच्या विरोधात गेल्या 20 सप्टेंबरपासून व्यापाऱ्यांनी कांद्याचे लिलाव बंद ठेवले होते.

**रब्बी हंगाम**

राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या सर्वदूर पावसामुळे खरीप पिकांना दिलासा मिळाला असून, रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्यांसाठीही आशादायक चित्र निर्माण झालं आहे. रब्बीमध्ये प्रामुख्याने ज्वारी आणि  गव्हाच्या पिकक्षेत्रात  वाढ अपेक्षित असून, हरभऱ्याचा पेरा नवा उच्चांक गाठण्याचा अंदाज वर्तविण्यात आला. या वर्षीच्या रब्बी हंगामात, कृषी आयुक्तालयाने सुमारे 62 लाख 77 हजार हेक्टर क्षेत्रावर पेरण्यांचे नियोजन केल्याचं सांगण्यात आलं आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन कक्षाच्या वतीने गावांचा घनकचरा आणि सांडपाणी निर्देशांक काढला जात आहे. ऐकुया त्याविषयी सविस्तर माहिती देणारा हा वृत्तांत

**धाराशिव जिल्ह्यात स्वच्छतेची व्याप्ती वाढवण्यासाठी पहिल्या टप्प्यात आठ तालुक्यातील 80 गावांचं मूल्यांकन केलं जाणार आहे. यात गावातल्या कचरा साठवण्याचे ठिकाण , गावातला कचरा संकलन आणि विलगीकरण , गावातल्या स्वयंसहायता समूहाच्या साहाय्याने कचरा वर्गीकरण , गावातलं उघड्यावर शौच बंद करून शौचालय वापर वाढवण, शौचालयांना नळ जोडणी, गावात उघड्यावर सोडलेल्या सांडपाण्याच व्यवस्थापन, शोष खड्डे निर्मिती ,गावात वृक्ष लागवड आणि गावकऱ्यांच्या श्रमदानातून सुशोभीकरण ,प्लास्टिक कचरा संकलन आणि त्याचं व्यवस्थापन, कचऱ्यासाठी कंपोस्टिंग सुविधा यावर मूल्यांकन केलं जाणार आहे .याची गुणांकन प्रतवारी करून गावात स्वच्छतेसाठी प्रोत्साहन दिलं जाणार आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियान टप्पा दोन अंतर्गत स्वच्छतेला गती मिळणार आहे. आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.**

**आशियाई स्पर्धा**

चीन मधील होंगचौ इथे सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी कालही चमकदार कामगिरी करत, 2 सुवर्ण, 2 रौप्य आणि 5 कास्य पदकांची कमाई केली. कालचा दिवस मैदानी स्पर्धेतील खेळाडूंनी गाजवला. महिलांच्या भालाफेक स्पर्धेत अन्नु राणीनं सुवर्णपदक पटकावलं. तर महिलांच्या 5 हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत पारुल चौधरीने सुवर्ण पदकाला गवसणी घातली. पुरुषांच्या डिकॅथलॉन स्पर्धेत रौप्य पदक मिळवत तेजस्विन शंकरनं ऐतिहासिक

कामगिरी केली. तसंच पुरुषांच्या ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत मोहम्मद अफझल यानं रौप्य पदक मिळवलं.15 सुवर्ण, 26 रौप्य आणि 28 कास्य अशा एकंदर 69 पदकांसह भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.

**पाऊस मान**

यंदाच्या पावसाळ्यात आतापर्यंत राज्यात  सरासरी 1011 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. राज्यात आतापर्यंत  सरासरीच्या 91 पूर्णांक 60 शतांश टक्के पाऊस झाला. जूनमध्ये सरासरीच्या 53 पूर्णांक 7 दशांश टक्के, जुलैमध्ये 138 पूर्णांक 7 दशांश टक्के ऑगस्टमध्ये 38 टक्के सप्टेंबरमध्ये 128 पूर्णांक 8 दशांश टक्के तर ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत सरासरी 71 पूर्णांक 1 दशांश मिलीमीटर  पाऊस झाला आहे.

**हवामान**

राज्यात आज हवामानाचा कोणताही इशारा नाही. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडेल.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**